10th Pune International Film Festival 2012

कृपया प्रसिद्धीसाठी

दिनांक १८जानेवारी २०१२

# १० वा पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव
# दिनांक १९ जानेवारी रोजी बक्षिस वितरणासह सांगता

दिनांक १२ जानेवारी पासून ७ दिवस पुण्यात सुरू असणाऱ्या १० व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा समारोप व बक्षिस वितरण समारंभ गुरूवार दि. १९ जानेवारी रोजी सायंकाळी ०४.३० वाजता सिटी प्राईड मल्टिप्लेक्स-कोथरूड येथे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक राज्यमंत्री श्रीमती फौजिया खान यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. या सांगता समारंभात विविध पुरस्कारांचे वितरण हे विशेष आकर्षण ठरणार आहे. या सांगता समारंभास जर्मनीचे भारतातील राजदूत कॉर्ड मीयर-क्लोल्डट् हे प्रमख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून, महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, पर्यटन व उत्पादन शुल्क खात्याचे मुख्य सचीव आनंद कुलकर्णी,प्रख्यात चित्रपट निर्माते व दिग्दर्शक सुभाष घई, गोहेत इन्स्टिटयूटचे डायरेक्टर मायकेल फ्लूक्ट हे सन्माननिय पाहुणे म्हणून याप्रसंगी उपस्थित राहतील. तसेच सर्व आंतरराष्ट्रीय ज्युरी, चित्रपट क्षेत्रातील अनेक नामवंत व चित्रपट रसिक या समारंभास मोठ्या संख्येने उपस्थित राहतील.

या महोत्सवात विविध पुरस्कारांचे वितरण हा उत्कटतेचा क्षण असणार आहे. या सांगता समारंभात पुढील पुरस्कार प्रदान केले जातील
जागतिक स्पर्धा विभागात महाराष्ट्र शासनाचे दोन पुरस्कार पुढीलप्रमाणे -
१) महाराष्ट्र शासन 'प्रभात' सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय चित्रपट - १० लाख रुपये
२) महाराष्ट्र शासन 'प्रभात' सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय दिग्दर्शक - ५ लाख रुपये

जागतिक मराठी चित्रपट स्पर्धा विभागात महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार पुढीलप्रमाणे - महाराष्ट्र शासन 'संत तुकाराम' सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय मराठी चित्रपट - ५ लाख रुपये

अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळातर्फे मराठी चित्रपटातील सर्वोत्कृष्ट अभिनेता, सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक आणि सर्वोत्कृष्ट पटकथा लेखन यासाठी प्रत्येकी २५,००० रूपयांचे पुरस्कार दिले जातील.

या सांगता समारंभातच पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातर्फे 'एफ.टी.आय.आय. बेस्ट स्टुंटेड ऑफ द फायनल इयर इन डायरेक्शन' हा मागील वर्षापासून सुरू करण्यात आलेला २५,००० रूपयांचा पुरस्कार दिला जाईल. तसेच व्हिसलिंग वुडस् इंटरनॅशनलतर्फे विद्यार्थी चित्रपट विभागात - सर्वोत्कृष्ट विद्यार्थी लघुपट (२००० डॉलर्स), सर्वोत्कृष्ट विद्यार्थी दिग्दर्शक (१००० डॉलर) सर्वोत्कृष्ट विद्यार्थी पटकथा संवाद लेखन (१००० डॉलर्स), सर्वोत्कृष्ट विद्यार्थी ॲनिमेशन चित्रपट (१००० डॉलर्स) आणि सर्वोत्कृष्ट विद्यार्थी ऑडिओग्राफर, सिनेयायझर आर्ट ऑडिओग्राफर इक्विपमेंट वर्थ (१५०० डॉलर्स) हे पुरस्कार दिले जातील. यंदापासून प्रथमच पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात पिफ ऑडीयन्स ॲवॉर्ड ही दिला जाणार आहे. या सांगता समारंभात मंचावर सादर होणारा जर्मनहून आलेला Top Dog Brass Band हे एक वेगळे वैशिष्टय ठरेल.

या समारोप सोहळ्यानंतर महाराष्ट्र शासन प्रभात सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय चित्रपट पुरस्काराने सन्मानित झालेला चित्रपट तेथे दाखविला जाईल.
www.puneinternationfilmfestival.com
कळावे,

प्रवीण प्र. वाळिंबे

प्रवीण प्र. वाळिंबे
मीडिया को-ऑर्डिनेटर
९८२२४५४२३४ / ९४०५०३५४५८

Pune Marathon Bhavan, Near Mitra Mandal Colony, Opp. Parvati P. O.,
Pune - 411009, India. Tel: +91 20 24424545, Fax: +91 20 24428788,
Email: piff.india@gmail.com Website: www.puneinternationalfilmfestival.com
R. No. : F - 24914 / Pune S/R. No. : MAH / 1325 / 2009 / Pune

ORGANIZED BY Pune Film Foundation

JOINTLY WITH Government of Maharashtra